**SUCCESS KEY TEST SERIES**
**WORKSHEET**

| | | |
|---|---|---|
| **Std: VIII (E.M)** | **Subject: Marathi** | **Time: 1Hrs** |
| **Date :** | **Chapter 2 & 3** | **Max Marks: 30** |

**विभाग १ : गद्य**

**Q.1 (क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

प्र. 1. अ. आकृतीबंध पूर्ण करा. (1)




आ. पाठात आलेला शब्द लिहा (1)

i. गावातील बाजार –

ii. माध्यमिक शाळेत असताना शास्त्रज्ञाचा धडा –

आमच्या गावात आठवडे बाजार भरायचा. म्हादू आयते कपडे विकायला यायचा. सगळा डोंगर भाग. फक्त पायवाटा. तो आपला माल घोड्यावर लादून आणायचा. नांद्रुकीच्या झाडाची दाट सावली पडायची. तो झाडाच्या मुळीला घोडा बांधून ठेवायचा. आम्हांला घोड्याची लीद दिसली. लीद म्हणजे घोड्याचं शेण. त्यात बरेच धागेधागे दिसत होते. हे धागे माती धरून ठेवतील , असा विचार करून आम्ही तो प्रयोग केला. आता आमच्या मूर्तींना बिलकुल तडे जात नव्हते. 'केवढा आनंद झाला' हे मला शब्दांत सांगता येणार नाही. मी माध्यमिक शाळेत असताना आर्किमीडिज या शास्त्रज्ञाचा धडा वाचला. त्याला हवं होतं ते तत्त्व शोधण्यासाठी तो साध्या वाटणाऱ्या गोष्टीतही ते शोधत राहायचा. ते सापडल्यावर तो न्हाणीघरातून 'युरेका युरेका' करत धावत सुटला. तेव्हा माझ्या लक्षात आलं , की आपल्यालाही तेवढाच आनंद झाला होता जेव्हा मूर्तींना तडे जाण्याचं थांबलं होतं. आपल्या पुरता का होईना ; पण तो एक शोध होता.

मुलांनो, मी तुम्हांला एवढंच सांगीन , की तुमच्या प्रत्येकात आर्किमीडिज दडलेला आहे. त्याला कायम जागता ठेवा. तुमचं आभाळ कायम आनंदानं भरलेलं राहील.

प्र. 2. अ. चूक कि बरोबर ते लिहा . (1)

i. लीद म्हणजे गायीचं शेण.

ii. मूर्तीला बिलकूल तडे न गेल्याने लेखकाला खूप आनंद झाला.

आ. एका वाक्यात उत्तर लिहा (1)

i. आर्किमीडिजला हवं होतं ते तत्त्व शोधण्यासाठी तो कोणती गोष्ट करीत असे?

प्र. 3. अ. समानार्थी शब्द सांगा (1)

i. गाव ii. सावली

आ. अधिरेखीत शब्दांच्या जाती ओळखा. (1)

i. तो आपला माल <u>घोड्यावर</u> लादून आणायचा.

ii मी तुम्हांला एवढंच सांगीन, <u>की</u> तुमच्या प्रत्येकात आर्किमीडिज दडलेला आहे..

प्र. 4. 'तुमच्या प्रत्येकात आर्किमीडिज दडलेला आहे. त्याला कायम जागता ठेवा. तुमचं आभाळ कायम आनंदानं भरलेलं राहील.' या वाक्यांचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. (2)

**विभाग २ : पद्य**

**Q.2 खालील पदयाच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (8)**

प्र. 1. योग्य पर्याय निवडा. (2)

(अ) कलागुणांच्या क्षितिजावर प्रतिभेची पहाट उगवली, कारण _________

(१) सूर्योदय होऊन सकाळ झाली.

(२) नवे युग उजाडले.

(३) ज्ञानाचे तेज नव्या युगाच्या नभात पसरले.

(४) पक्ष्यांचा चिवचिवाट सुरू झाला.

(आ) कवीच्या मते 'मानवतेचे युग' म्हणजे- _________

(१) मानवांचे युग.

(२) नव्या विचारांचे युग.

(३) माणसाच्या प्रगतीचे युग.

(४) भेदाभेद नसलेले युग.

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.
भव्य पटांगण, बाग मनोहर
फुला-पाखरांचे जग सुंदर
आपुलकीचा सुवास पसरे
मनामनांतून इथे निरंतर.
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

पायाभरणी अस्तितत्वाची
प्रयोगशाळा व्यक्तितत्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई
इथे रुजवणूक त्या तत्त्वांची
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

नवीन स्वप्ने , नवीन आशा
ही प्रगतीची नवपरिभाषा,

परिश्रमाने, अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या देशा.
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

प्र. 2. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)
(अ) कवीच्या मते व्यक्तित्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रुजतील?
(आ) प्रगतीची नवपरिभाषा कोणती?

प्र. 3. तुम्हांला कळलेली कवीची प्रगतीची नवपरिभाषा स्पष्ट करा. (2)

प्र. 4. 'मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात', या विधानातील भाव स्पष्ट करा. (2)

**विभाग ३ : व्याकरण**

**Q.3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा** **2**

**(i)** मेंदूराजेसाहेबांचा जयजय कार असो!

**(ii)** काही दिवसांनी वाटायला लागलं, की यात रंग भरावेत; पण ते कुठून आणणार?

**(ख) विरुद्धार्थी शब्द लिहा** **2**

**(i)** गरमागरम

**(ii)** रागीट

**(ग) खालील वाक्यातील योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **2**

**(i)** भरत सांगतो जन्मापासून आंधळी आहे ती तुमचा अनोळखी हात म्हणून घाबरली

**(ii)** एवढ्यात भरत मला म्हणतो बाई हा मांजरांचा वि भाग बघायचाय

**(घ) पुढील शब्दसमूहासाठी इंग्रजी प्रतिशब्द लिहा** **3**

**(i)** आनंद घेणे

**(ii)** धाडस, धिटाई

**(iii)** डोंगर चढणीचा प्रवास

**विभाग ४ : उपयोजित लेखन**

**Q.4 पुढील विषयावर निबंध लिहा:** **5**

विदूषकाचे आत्मकथन

**-------- All the Best --------**